अधिसूचना

क्रमांक : २१/ २०२२ दिनांक : २४/०२/२०२२

विषय : शिक्षकांच्या रजासंदर्भात...

संदर्भ : १) शासन निर्णय क्र. MISC-2018/C.R.56/18/UNI-1, दि. ८.३.२०१९
२) शासन शुद्धिपत्रक क्र. Misc-2018/C.R.56/18/UNI-1, १०.५.२०१९

सर्व संबंधितांच्या माहितीकरिता सूचित करण्यात येते की, सातव्या वेतन आयोगाची अधिसूचना तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विनियम,२०१८ च्या अनुषंगाने शासनाने सर्व विद्यापीठ तसेच महाविद्यालयीन शिक्षकांना संदर्भ क्र.१ वरील शासन निर्णयान्वये सातवा वेतन आयोग लागू केला आहे. सदर शासन निर्णयाची विद्यापीठ निदेश क्र.८/२०१९ नुसार अंमलबजावणी करण्यात आली असून संदर्भ क्र.२ च्या शुद्धिपत्रकान्वये संदर्भ क्र.१ वरील शासन निर्णयामध्ये शासनाने शिक्षकांच्या रजांसंदर्भात परिच्छेद १६.० मध्ये सुधारणा केलेली आहे. त्यानुषंगाने निदेश क्र.१४/२०१९ अन्वये निदेश क्र.८/२०१९ ला सुधारणा करण्यात आलेली आहे. विद्यापीठ तथा महाविद्यालयीन शिक्षकांच्या रजाबाबत मा. कुलगुरूंनी गठीत केलेल्या समितीच्या शिफारशी दि.२९/३०.६.२०२० च्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेत बाब क्र.११ नुसार मान्य केल्या आहेत. त्यानुसार विद्यापीठ/ महाविद्यालयीन शिक्षकांना खालील प्रकारच्या रजा नमूद केल्यानुसार देय राहतील.

अ.क्र.	रजेचा प्रकार	रजेचा कालावधी
१	Study leave	As per M.C.S.R.(Leave), 1981.
२	Maternity leave	As per Govt. Resolution issued from time to time.
३	Casual leave	08 (Annual)
४	Child Care Leave	As per Govt. Resolution issued from time to time.

इतर रजा अध्यादेश क्र.१२२ व अध्यादेश क्र.२४ प्रमाणे अनुक्रमे विद्यापीठ तसेच महाविद्यालयीन शिक्षकांना यथास्थिती लागू राहतील.

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

*****